# जाहिर लिलाव सुचना

जिल्हा परिषद अकोला यांचे अधिनस्त असलेल्या विद्या मंदिर फार्म हाता . ता. बाळापुर येथील गट क्र. २४० मधील ३० हेक्टर (७५ एकर) गट क्र. ७६५ मधील १६ हेक्टर (४० एकर), गट क्र.५६७ मधील १६ हेक्टर (४० एकर) आणि मौजे निंबी (मालोकार) ता.अकोला येथील गट क्र. ५४ मधील १४.१३ हेंक्टर (३५ एकर) जमीन सन २०१९-२०२० हया वर्षीच्या ६/६/२०१ . ते ३१/३/२०२० पर्यंत १० महिन्याच्या कालावधी करिता वहीतीसाठी पटटयाने द्यावयाचे आहे. त्या करिता मौजे हाता येथील जमीनीचा लिलाव दिनांक ३० /०५/२०१९ ला सकाळी १०.०० वाजता जि. प. शाळा. हाता, आणि मोजे निंबी मालोकार येथील जमीनीचा लिलाव दिनांक ३१ /०५/२०१९ ला सकाळी १०.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय निंबी (मालोकार) येथे करण्यात येईल.

वहिती करिता शेती घेऊ इच्छिना-या शेतक-यांनी खालील अटि व शर्ती मान्य असल्यास लिलावाचे दिवशी ठरलेल्या वेळेवर उपस्थित रहावे .

१. लिलावात भाग घेण्यापुर्वी शेतक-यास लिलाव अधिकारी यांचे जवळ अनामत रक्कम रु. २०,०००/- रोखीने भरावी लागेल. अंतिम बोली बोलणारा शेतकरी वगळून जमा झालेली रक्कम आरटिजिएस व्दारे आपले खात्यात जमा करण्यात येईल.

२. अंतिम बोली बोलणा-यास ताबडतोब रु ३००००/- रोखीने जमा करावी लागेल आणि उर्वरित बोलीची संपुर्ण रक्कम लिलाव दिनांकापासुन सात (०७) दिवसाचे आत कृषि विभाग,जि.प. अकोला येथे धनाकर्षाव्दारे (डी.डी./आर.टी.जी.एस.) कृषि विकास अधिकारी जि.प.अकोला यांचे नावे भरावी लागेल. विहित मुदतीत उर्वरित रक्कम न भरल्यास जमा केलेली रक्कम रु ५००००/- जप्त करण्यात येईल .

३. जमीन ११ महीन्याच्या कालावधीकरीता वहीतीसाठी घेणाऱ्या शेतकऱ्यास रु ५००/- च्या स्टॅम्पपेपरवर कृषि विकास अधिकारी यांचेशी करारनामा लिहुन द्यावा लागेल .

४. लिलावामध्ये शेती घेणा-यास फार्मवरील कोणतीही सुविधा जि.प.कडून मिळणार नाही.उदा.जागा,गोडाऊन, बैलगाडी,पिक विमा योजना,शेतीविषयक साहीत्य इत्यादी.

५. शेतावरील झाडे माती बांध, ईत्यादी वर लिलावात जमीन घेणा-या शेतक-यांचा हक्क राहणार नाही.

६. लिलावात योग्य रक्कम प्राप्त न झाल्यास लिलाव रदद करण्याचे अधिकार लिलाव अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी जि.प. अकोला यांना राहतील .

७. नैसर्गिक आपत्तीमुळे ,गैरकायदेशिर अतिक्रमण,न्यायालयीन प्रकरणामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव झालेल्या नुकसानीस जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही, लिलावात जमीन घेतल्या बाबत फक्त प्रमाणपत्र देण्यात येईल.

८. या लिलावाव्दारे वहीतीस प्राप्त झालेल्या शेतीमुळे जमीन महसुल अधिनियम १९६६ तसेच या संदर्भातील इतर कुठल्याही कायदयाचे,नियमांचे,अधिनियमांचे,उल्लंघन होणार नाही याची खबरदारी लिलावधारकाने घेणे बंधनकारक राहील.

सही/-

अति मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अकोला

Scanned by CamScanner